३१) कायदा कलम ७०(ड) यास पात्र राहून बँकातून खाती उघडणे, ठेवी ठेवणे व त्यावर तसेच आर्थिक संस्थाबरोबर असे व्यवहार करण्याचे अधिकार बँकेचे अधिकाऱ्यांना देणे.

३२) संचालक मंडळावरील रिकाम्या झालेल्या जागा कायदा कलम ७३ सी.बी.प्रमाणे स्विकृती पध्दतीने भरणे.

३३) योग्य त्या संस्थांचे सभासदत्व घेणे व संलग्न होणे.

३४) भविष्य निर्वाह निधी चालू करणे व त्यास उत्तेजन देणे.

३५) आवश्यकतेनुसार विविध संस्थांचे वार्षिक सभांना प्रतिनिधी पाठविणे. त्यांच्या समितीवर/संचालक मंडळावर प्रतिनिधी पाठविणे तसेच जरुरीप्रमाणे विविध स्तरावरील होणाऱ्या चर्चा सत्रासाठी अधिवेशना-साठी प्रतिनिधी पाठविणे.

३६) खालीलबाबतीत वेळोवेळी नियम करणे, त्यात सुधारणा करणे, रद्द करणे, बदल करणे..

अ) सर्व प्रकारच्या ठेवी

ब) बँकींग व्यवहार, कर्जे व अनुषंगिक व्यवहार

क) भविष्य निर्वाह निधी, ग्रॅज्यइटी व बोनस

ड) कर्मचाऱ्यांची भरती

इ) कर्मचाऱ्यांसाठी सेवानियम, प्रवास भत्ते व अनुषंगिक नियम

प) निरनिराळ्या कर्जांचे नियम करणे.

ग) सर्व प्रकारच्या कर्जास गरजेनुसार एक वर्षापर्यंत मुदतवाढ देणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

घ) कर्जाची नियमीत परतफेड करणारे कर्ज खात्यावर रिबेट देणेचे निकष ठरविणे व रिबेटचा दर ठरविणे.

च) रिझर्व्ह बँक व सहकार खात्याच्या मार्गदर्शक तत्वानुसार कोणत्याही कर्जाची पुर्नबांधणी करणे आणि सवलतीबाबत निर्णय घेणे.

छ) वार्षिक साधारण सभेच्या मंजूरीने संशयीत अथवा बुडीत कर्जे माफ करणे.

ज) सभासदांकडून येणे असलेल्या सर्व प्रकारच्या थकबाकीचा विचार करणे व त्यावरील कारवाईसंबधी निर्णय घेणे जरुर तेथे तडजोड म्हणून जादा व्याजात अगर सरळ व्याजात सुट देणे.

**४५) संचालक पदासाठी अपात्र होणे. :**

कोणताही सभासद बँकेवर संचालक म्हणून निवडून येण्यास अथवा संचालक सदस्य होण्यास अपात्र ठरेल जर असा सभासद –

१) कोणत्याही अधिकृत न्यायालयाने नादार म्हणून दोशी ठरविल्यास अथवा मानसिक दृष्ट्या दुर्बल आहे असे ठरविल्यास.